कनिष्ठ सहाय्यक गट-क या पदावरून परिचर
गट-ड या पदावर पदावनत करणे बाबत.
(श्री भानुदास त्रिंबक शेकडे, कनिष्ठ सहाय्यक,
प्रा.आ.केंद्र माणिकदौंडी ता. पाथर्डी)

जिल्हा परिषद अहिल्यानगर
सामान्य प्रशासन विभाग
जिल्हा परिषद आदेश क्रमांक.साप्रवि/आस्था-३/३६७९५९८/८८६/२०२६
अहिल्यानगर दिनांक :- स्वाक्षरी खाली नमुद केले प्रमाणे

वाचा:- १. महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम १९८१ मधील नियम २७ (१) (बी)
२. इकडील आदेश जा.क्र.साप्रवि-१/आस्था-३/१३२५/२०२४ दिनांक १५/१०/२०२४
३. वैद्यकिय अधिकारी, प्रा.आ.केंद्र माणिकदौंडी ता.पाथर्डी यांचेकडील पत्र जा.क्र.प्रआके/२४२/२०२६ दिनांक २४/०९/२०२६

श्री.भानुदास त्रिंबक शेकडे, कनिष्ठ सहाय्यक, प्रा.आ.केंद्र माणिकदौंडी ता. पाथर्डी यांना संदर्भ क्रमांक ०२ च्या आदेशान्वये परिचर गट-ड या संवर्गातुन कनिष्ठ सहाय्यक (लिपीक) गट-क या पदावर प्रा.आ.केंद्र माणिकदौंडी ता.पाथर्डी येथे पदस्थापना देण्यात आलेली आहे.

तथापी श्री.भानुदास त्रिंबक शेकडे, कनिष्ठ सहाय्यक, प्रा.आ.केंद्र माणिकदौंडी ता. पाथर्डी यांनी संदर्भ क्र. ३ च्या विनंती अर्जाव्दारे कौटुंबिक कारणास्तव कनिष्ठ सहाय्यक गट-क या पदावरुन परिचर गट-ड या पदावर पदावनत करणेबाबत विनंती केलेली आहे.

त्यानुसार संदर्भ क्रमांक ०१ मधील तरतुदीनुसार मी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर श्री.भानुदास त्रिंबक शेकडे, कनिष्ठ सहाय्यक, प्रा.आ.केंद्र माणिकदौंडी ता. पाथर्डी यांना कनिष्ठ सहाय्यक या पदावरून **परिचर गट-ड** या पदावर पदावनत करून त्यांना परिचर गट-ड या पदावर भज-ड प्रवर्गात सुधारीत वेतन मॅट्रिक्समधील वेतनस्तर एस-१ (१५०००-४७६००) या वेतनश्रेणीमध्ये ..... ग.शि.अ. पं.स. पाथर्डी ..... येथे पदस्थापना देत आहे.

तसेच श्री.भानुदास त्रिंबक शेकडे, कनिष्ठ सहाय्यक, प्रा.आ.केंद्र माणिकदौंडी ता. पाथर्डी यांची परिचर गट-ड या पदावर वेतन निश्चिती करतांना त्यांना कनिष्ठ सहाय्यक गट-क या पदावर पदोन्नती दिली नसती तर त्यांनी जे वेतन घेतले असते त्याप्रमाणे वेतन निश्चिती करण्यात यावी. तसेच श्री.भानुदास त्रिंबक शेकडे, कनिष्ठ सहाय्यक, प्रा.आ.केंद्र माणिकदौंडी ता.पाथर्डी यांना सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ अनुज्ञेय नाही. सदर आदेशाची अंमलबजावणी तात्काळ करण्यात येऊन त्याची नोंद संबंधिताचे मुळ सेवापुस्तकात घेण्यात यावी.

सदर आदेश अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्र. 202611040401198. असा आहे.

Digitally signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 04-11-2026 14:08:21
(आनंद भंडारी, भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,
श्री.भानुदास त्रिंबक शेकडे, कनिष्ठ सहाय्यक, प्रा.आ.केंद्र माणिकदौंडी ता. पाथर्डी
द्वारा व प्रत:- वैद्यकिय अधिकारी, प्रा.आ.केंद्र माणिकदौंडी ता.पाथर्डी
प्रत:- गटशिक्षणाधिकारी प.स.पाथर्डी.
प्रत:- कार्यासन आस्था-४, सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद अहिल्यानगर
प्रत:- निवड नस्ती